RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १०५] शुक्रवार, ऑगस्ट २, २०१९/श्रावण ११, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट २०१९

**अडचणींचे निराकरण**

**आदेश**

**महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०१९.**

क्रमांक वसेक-१०१९/प्र.क्र.-३४/कराधान-१.—महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. १५) (यापुढे या आदेशामध्ये 'तडजोड अधिनियम' असे संबोधण्यात येईल) संबध्द अधिनियमाखालील कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीच्या (यापुढे या आदेशामध्ये 'थकबाकीची तडजोड' असे संबोधण्यात येईल) तडजोडीची तरतूद करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, तडजोड अधिनियमाच्या कलम ४ नुसार थकबाकीच्या तडजोडीसाठी दोन टप्पे देण्यात आलेले आहेत म्हणजेच पहिला टप्पा आणि दुसरा टप्पा तसेच थकबाकीच्या तडजोडीसाठीचा अर्ज दाखल करण्याकरिताचा कालावधी व आवश्यक रकमेचा भरणा करण्याकरिताचा कालावधी दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, तडजोड अधिनियमाच्या कलम ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पहिल्या टप्प्यासाठी अर्ज संगणकीय प्रणाली द्वारे दाखल करण्यासाठी व आवश्यक रकमेचा भरणा करण्यासाठी वेळेची मर्यादा ३१ जुलै २०१९ होती;

आणि ज्याअर्थी, राज्यकर विभागाच्या संगणकीय प्रणालीतील काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यमुळे काही करदात्यांना दिनांक ३१ जुलै २०१९ किंवा त्यापूर्वी आवश्यक रकमेचा भरणा करुनही अर्ज दाखल करता आला नाही तसेच उक्त कारणामुळे काही करदात्यांना तडजोड अधिनियमाच्या कलम ४ मध्ये दिलेल्या पहिल्या टप्प्यासाठीच्या विहित मुदतीमध्ये अर्ज सादर करणे किंवा आवश्यक रकमेचा भरणा करणे शक्य झाले नाही आणि यामुळे, तडजोड अधिनियमांचा उक्त तरतूदींची अंमलबजावणी करता येऊ शकत नाही ;

आणि ज्याअर्थी उक्त करदात्यांच्या समुहास तडजोड अधिनियमातील पहिल्या टप्प्यासाठी अर्ज सादर करणे व आवश्यक रकमेचा भरणा करणे यासाठी कलम २० च्या उप-कलम (१) अन्वये आदेशाद्वारे उक्त अडचणींचे निराकरण करण्यासाठी संधी देणे निकडीचे आहे ;

म्हणून, आता, तडजोड अधिनियमाच्या कलम २० च्या पोट-कलम (१) द्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे खालील आदेश देत आहे, म्हणजेच :—

१. या आदेशाला महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (अडचणींचे निराकरण) आदेश, २०१९ असे म्हणावे.

२. वरील नमूद, अडचणींचे निराकरण करण्यासाठी, असे घोषीत करण्यात येते की, पहिल्या टप्प्यासाठी,—

(१) अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे थकबाकीच्या तडजोडीच्या प्रयोजनार्थ, ३१ जुलै २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी आवश्यक रकमेचा भरणा करणाऱ्या, परंतु ३१ जुलै २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज दाखल करु शकले नाहीत अशा निश्चित केलेल्या करदात्यांसाठी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ ऑगस्ट २०१९ असेल;

(२) निश्चित करण्यात आलेल्या करदात्याने जर थकबाकीच्या तडजोडीच्या प्रयोजनार्थ तडजोड अधिनियमास जोडलेल्या जोडपत्र-क किंवा जोडपत्र-ख सह कलम १० मध्ये नमूद आवश्यक रकमेचा भरणा करण्याचा प्रयत्न दिनांक ३१ जुलै २०१९ रोजी केला असेल व असा भरणा अयशस्वी झाला असेल तर अशा करदात्यांच्या संदर्भात आवश्यक रकमेचा भरणा करण्यासाठीचा अंतिम दिनांक ९ ऑगस्ट २०१९ असेल, आणि अशा करदात्यांसाठी अर्ज दाखल करण्यासाठीचा अंतिम दिनांक १४ ऑगस्ट २०१९ असा असेल.

३. उपरेक्त परिच्छेदात नमूद करदात्यांचे निश्चितीकरण राज्यकर आयुक्त करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd August 2019

**Removal of Difficulty**

ORDER

MAHARASHTRA SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE ACT, 2019.

No. GST-1019/C.R.-34 /Taxation-1.—Whereas, the Maharashtra Settlement of Arrears of Tax, Interest, Penalty or Late Fee Act, 2019 (Mah. XV of 2019) (hereinafter in this Order referred to as “the Settlement Act”) provides for the settlement of the arrears of the tax, interest, penalty or late fee (hereinafter in this Order referred to as “settlement of arrears”) under the Relevant Act ;

And whereas, for settlement of arrears, section 4 of the Settlement Act provides for the two Phases i.e. First Phase and Second Phase and also provides for the time limit within which the application for settlement of arrears shall be submitted and payment of the requisite amount shall be made ;

And whereas, the time limit under the First Phase for submission of application electronically and the payment of the requisite amount was upto the 31st July 2019 ;

And whereas, due to technical glitches in computer application of the State Tax Department, certain taxpayers were unable to submit the said application despite the payment being made in this behalf on or before the 31st July 2019 and certain taxpayers due to aforesaid reasons were also unable to submit such applications and make the payment of the requisite amount within the time limit given for the First Phase as referred in section 4 of the Settlement Act which has resulted into difficulties for giving effect to the provisions of the Settlement Act ;

And whereas, it is expedient to provide an opportunity to the aforesaid class of taxpayers, so as to enable them to submit the application and make the payment of the requisite amount under the Settlement Act for the First Phase by issuing Order under sub-section (1) of section 20 of the Settlement Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 20 of the Settlement Act, for the removal of the aforesaid difficulties, the Government of Maharashtra hereby makes the following Order, namely :—

1. This Order may be called the Maharashtra Settlement of Arrears of Tax, Interest, Penalty or Late Fee (Removal of Difficulties) Order, 2019.

2. For the removal of difficulties as specified above, it is hereby declared that, the last date for the First Phase for,—

(1) submission of application shall be the 14th August 2019, only in respect of the identified taxpayers who have made the payment of the requisite amount as mentioned in the application, for the purpose of settlement of arrears, on or before the 31st July 2019, but failed to submit such application on or before the 31st July 2019 ;

(2) the payment of the requisite amount, as given in section 10 read with Annexure-A or Annexure-B appended to the Settlement Act, shall be the 9th August 2019, only in respect of the identified taxpayers who on the 31st July 2019 have attempted to make the payment

for the purpose of settlement of arrears but the said payment remained unsuccessful, and the date for submission of application in respect of these taxpayers shall be the 14th August 2019.

3. The identification of taxpayers as mentioned in preceding paragraphs shall be undertaken by the Commissioner of State Tax.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.